**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६५ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २०८** **दिनांक — १७/१०/२०२५**

**विभाग — मार्केट विभाग**

---

प्रस्तावाचा विषय — पे & पार्कचा कार्यकाळ संपला असुन त्याची ५०,०००/- अनामत रक्कम परत मिळावी,

--**--

ठराव — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, श्री. संतोष मोहनराव भोसले यांनी सन २०१६ मध्ये पे & पार्क साठी रू. ५०.०००/- अनामत भरली असुन आता त्या पे & पार्कचा कार्यकाळ संपला असुन त्याची अनामत रक्कम परत मिळावी, असा अर्ज सादर केलेला आहे.

या बाबत वास्तविक परिस्थिती अशी की, मा. स्थायी समिती ठराव क्र.६६ दि. ३०-०१-२०१६ अन्वये यश पॅलेस ते चाणक्य चौक रोडवरील आनंदऋषी हॉस्पीटल ते गुगळे बंगला माणिक नगर लगत असणारी पार्किग ११ वर्ष मुदतीने अर्जदार श्री. संतोष मोहनराव भोसले यांना देणे बाबतचा ठराव पारित करण्यात आलेला होता. मात्र तत्कालीन मा. उपायुक्त यांनी दि. .३०./०४/२०१६ रोजी सदरचा पे & पार्क दरवर्षी 10% दरवाढीसह 3 वर्षाकरिता देण्यात यावा, असा अभिप्राय देण्यात आहे. त्यानुसार सदरचा पे & पार्कचा ठेका श्री. संतोष मोहनराव भोसले यांना 3 वर्षाकरीता देण्यात आलेला आहे. सदर ठेका देतांना श्री. संतोष मोहनराव भोसले यांच्याकडुन सामान्य पा.क्र. 40016 दि.30-04-2016 रोजी रु.50,000/- इतकी अनामत रक्कम भरुन घेतलेली आहे. सदर ठेक्याचा कार्यकाळ संपलेला असल्याने अर्जदार श्री. संतोष मोहनराव भोसले यांनी भरलेली अनामत रक्कमेचा परतावा देणे योग्य वाटते तसेच सदर रक्कमेचा धनादेश अर्जदार श्री. संतोष मोहनराव भोसले यांच्या नांवे काढणेस अर्थ विभागास आदेश होणेस्तव सादर, असा प्रस्ताव दिनांक 21-08-2025 रोजी सादर करण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावर मा. मुख्य लेखापरिक्षक यांनी महाराष्ट्र लेखासंहिता अधिनियम 2011 मधील प्रकरण 20 नियम 299 नुसार तीन वर्ष पूर्ण झालेल्या व्यपगत ठेवींना मा. महासभेची मान्यता घेणे आवश्यक राहिल,त्यानुसार श्री. संतोष मोहनराव भोसले यांनी भरलेली रु.50,000/- अनामत रक्कमेचा परताव्यास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६५ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २०९** **दिनांक — १७/१०/२०२५**

**विभाग —सार्व. बांध विभाग**

---

प्रस्तावाचा विषय — शहर सौदर्यकरण अंतर्गत गुलमोहर पोलिस चौकी चौक सुशोभिकरण करणे एवजी पारिजात चौक ( दक्षिण बाजुस) सुशोभिकरण करणेबाबत.

--**--

ठराव — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, शहर सौदर्यकरण सन २०२३-२४ अंतर्गत गुलमोहर पोलिस चौकी चौक सुशोभिकरण करणे या कामाचे कार्यारंभ आदेश चेअरमन, किर्ती इले. पे. व सि. मजुर सहकारी संस्था मर्या, अहिल्यानगर यांना देण्यात आलेले आहे.

तसेच स्थानिक नगरीक व व्यावसायीक यांचे सदर काम करणेस विरोध असुन सदर चौक आधीच छोटा भोवतालच्या परिसरात मंगलकार्यालये, पेट्रोल पंप तसेच छोटे बाजार असल्याने सदरा चौकातुन प्रचंड प्रमाणात वाहतुक होत असते. त्यामुळे गुलमोहर पोलिस चौकी चौक सुशोभिकरण करून वाहतुक कोंडीस आमंत्रण देणे संयुक्तीक ठरणार नाही. तरी मनपा मार्फत गुलमोहर पोलिस चौकी चौक एवजी त्याच रकमेचे व त्याच अंदाजपत्रकानुसार पारिजात चौक ( दक्षिण बाजुस ) सुशोभिकरण करण्यात यावे, असे म्हंटलेले आहे.

त्यानुसार गुलमोहर पोलिस चौकी चौक या ठिकाणी सुशोभिकरणाचे काम करणे शक्य नसल्याने उपरोक्त संदर्भान्वये संबंधीत मजुर संस्थेमार्फत गुलमोहर पोलिस चौकी चौक एवजी त्याच रकमचे व त्याच अंदाजपत्रकानुसार पारिजात चौक ( दक्षिण बाजुस ) सुशोभिकरण करणे उचित वाटते.

तरी उपरोक्त प्रमाणे गुलमोहर पोलिस चौकी चौक सुशोभिकरण करणे एवजी पारिजात चौक ( दक्षिण बाजुस ) या ठिकाणी त्याच रकमेचे व त्याच संस्थेमार्फत सुशोभिरणाचे काम करणेच्या मान्यतेच तसेच संबंधीत मजुर संस्थेस तसे सुधारीत कार्यादेश देणेच्या प्रस्तावास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६५ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २१०** **दिनांक — १७/१०/२०२५**

**विभाग — उद्यान विभाग**

---

प्रस्तावाचा विषय — इ-निविदा क्र. १५५० अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी कचरा डेपो भोवती हरितपट्टे विकसित करणे कामाची अनामत रक्कम परतावा बाबत.

--**--

ठराव — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, अहमदनगर महानगर पालिका हद्दीतील सावेडी कचरा डेपो भोवती हरितपट्टे विकसित करणेकामी ई-निविदा क्र. १५५० प्रक्रिया राबवून काम करण्यात आलेले आहे. त्यानुसार खालील प्रमाणे ठेकेदार यांनी अनामत रक्कम भरलेली आहे.

१) अंतिम बील प्रदानः- ( सिस्टीम बिल क्र. १५७६) रू. १४,८३,०८१/- दि.१८/०८/२०२२. प्रमाणक क्रमांक रक्कम दिनांक

२) रोख / मुदत ठेव / नॅशनल सेव्हिंग / FDR स्वरूपात भरलेली पावती नंबर F१०४/१०३०३ रक्कम रू. ३४,४७५/- दि.११/०१/२०१८

३) बिलातून कपात केलेली —रक्कम रू. ३७,०७७

४) प्रमाण्क क्रमांक ( स्स्टिीम बिल क्र. १५७६) २.५०% रक्कम रू.३७,०७७/- दि.१८/०८/२०२२

५) प्रमाणक क्रमांक ( सिस्टीम बिल क्र. १५७६) २०% रक्कम रू.२,९६,६१६/- दि.१८/०८/२०२२

६) स्क्यिुरीटी डिपॉ. एकूण डिपॉ. रक्कम रू.३,७१,१६८/-

वरील प्रमाणे ठेकेदार यांनी भरलेली व बिलातून कपात केलेली अनामत एकूण रक्म रू. ३,७१,१६८/- परतावा करणेबाबत दि. २५/०८/२०२५ रोजी मागणी केलेली आहे.

त्यानुसार सदरील अनामत रक्कम परतावा करणेकामी प्रस्तावित करण्यात आले असता सदरील अनामत व्यपगत झालेबाबत अर्थ विभागा मार्फत नोंदविण्यात आले आहे. त्यानुसार महाराष्ट्र लेख संहिता २०११ मधील प्रकरण २० नियम २९९ मधील तीन वर्षे पूर्ण झालेल्या व्यपगत ठेविनां माा.महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. त्याकरीता अनामत रक्कम रू. ३,७१,१६८/- ए.जी वाबळे, अहिल्यानगर यांना अदा करणेस मा. प्रशासक सर्व साधारण सभा मजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| ( सही ) | ( सही ) |
| ( मेहेर लहारे ) | ( यशवंत डांगे ) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६५ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २११** **दिनांक — १७/१०/२०२५**

**विभाग — कोंडवाडा विभाग**

---

प्रस्तावाचा विषय — शंभुराजे बहुउद्देशीय प्रतिष्ठान यांच्या थकीत देयका बाबत.

--**--

ठराव — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, श्री संतोष नवसुपे अध्यक्ष शंभूराजे बहुउद्देशीय संस्था यांना मनपाद्दीतील मोकाट उनाड, भटके पिसाळलेले कुत्रे पकडण्यासाठी सन 2017 ते 2018 या आर्थिक वर्षात कुशल मजूर व वाहन पुरविणे साठी प्रतिदिन दर १९९२/- प्रमाणे केलेल्या कामाचे थकीत देयकाची नस्ती गाळ झाले बाबत संदर्भीय पत्र सर्व खाते प्रमुख / विभाग प्रमुख यांना दिले असता सर्व बांधकाम विभाग जाक्र ३५४५ दि.०६/१२/२०२३ रोजी कामगार विभाग जावक क्रमांक २४८ दि ४/१२/२०२३ व सा प्र.वी. जा क्र 668 दि. 05/12/2023 अन्वये इकडेच पत्र देऊन सदर च्या पत्रात सदरची नस्तीचा शोध घेतला असता सदरची नस्ती विभागांमध्ये आढळून आलेली नाही असे कळविलेले आहे.

तरी श्री संतोष नवसुपे अध्यक्ष शंभुराजे बहुउद्देशीय संस्था यांनी सन 2017 2018 या आर्थिक वर्षात मनपा हद्दीतील मोकाट उनाड भटके पिसाळलेले कुत्रे पकडण्यासाठी केलेल्या दि 01/04/2017 ते 30/06/2017 कामकाजाचे रुपये 7,66,920/-अक्षरी सात लाख सहासष्ट हजार नऊशे वीस मात्र थकीत देयके मा. मुख्य लेखा परीक्षक यांच्या अभिप्रायानुसार महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 168 प्रमाणे मुदतबाह्य मागणी असल्याने सदरचे देयके श्री. संतोष नवसुपे अध्यक्ष शंभूराजे बहुउद्देशीय संस्था यांना अदा करण्यास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६५ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २१२** **दिनांक – १७/१०/२०२५**

**विभाग –पाणी पुरवठा विभाग**

---------------------------------------------------------------------------------------------

प्रस्तावाचा विषय – अहिल्यानगर महानगरपालिके अंतर्गत खाजगी व्यक्तींना प्लंबर ( नळकारगीर) देणे बाबतचे धोरण ठरविणे बाबत.

--**--

ठराव – विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत नागरीकांना सरकारी सेवा जलद आणि पारदर्शकपणे मिळणे अनुषंगाने अहिल्यानगर महानगरपालिकेमार्फत विविध उपाययोजनांची अंमलबजावणी व कार्यवाही करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने अहिल्यानगर महानगरपालिकेमध्ये हद्दीतील नागरिकांचे खाजगी नळ कनेक्शन दुरूस्ती अनुषंगाने करावयाची कामे जलद व प्रभावी होण्याच्या दृष्टीकोनातून महानगरपालिका हद्दीतील खाजगी नळ कारागीरास विहीत अटी व शर्तीनुसार तात्पुरत्या स्वरूपात परवाना (लायसन्स) देणेचे महानगरपालिकेचे धोरण आहे.

त्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २२ लायसन्स आणि परवाने मधील तरतुदी नुसार मा. स्थायी समितीचे परवानगीने नळकारागीर यांस लायसन्स देता येईल. कलम ३७२ नळ कारागीर यांस लायसन्स देणे

१. आयुक्तास, त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीला या अधिनियमाच्या प्रायोजनासाठी (पाच) नळकारागीर म्हणून काम करणेसाठी एका वर्षाच्या मुदतीसाठी नवीकरण करता येईल असे लायसन्स देता येईल.

२. अशा व्यकतीस, उपवीधीन्वये विहीत करण्यात येईल अशी अर्हता किंवा अनुभव असल्याखेरीज पोटकलम (१) अन्वये कोणतेही लायसन्स दिले जाणार नाही.

३. अर्जदारास उपविधीन्वये विहीत केलेली अर्हता आणि अनुभव असेल तर, अक्षमता, गैरवर्तणूक किंवा अन्य गंभीर करणामुळे अर्जदार असे लायसन्स धारण करण्यास अयोग्य आहे. या कारणास्तव असेल त्या व्यतिरीक्त लायसन्ससाठी केलेला कोणताही अर्ज नाकारता येणार नाही.

कलम ३७४- स्थायी समितीने लायसन्सदार, नळकारागीरांची फी आणि आकार विहीत करणे. स्थायी समितीस अधिनियमाच्या कोणत्याही प्रायोजनासाठी केलेल्या कोणत्याही कामासाठी त्यांना दयावयाची फी किंवा आकार वेळोवेळी विहीत करता येईल. कोणतेही लायसन्सदार नळकारागीरास अशा कोणत्याही कामासाठी अशा रितीने विहीत केलेल्या फि किंवा आकारापेक्षा अधिक फी किंवा आकार मागता किंवा स्विकारता येणार नाही.

कलम - ३७५ काल योग्य रितीने पार पाडणे हे लायसन्सदार नळकारागीरांवर बंधनकारक असणे कोणत्याही लायसन्सदार नळकारागीरांनी या अधिनियन्वये करावयाचे कोणतेही काम. निष्काळजीपणाने

वा हयगायीने करता कामा नये किंवा अशा कोणत्याही प्रायोजनासाठी कोणतेही खराब सामान, उपयंत्र जोडणी वापरता कामा नये.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत नागरिकांना सरकारी सेवा जलद आणि पारदर्शकपणे मिळणेच्या दृष्टीकोनातून खाजगगी नळ कारागीरास अधिनियमातील वरील नमूद तरतूदीतील अटी व शर्तीच्या अधिन राहून उच्चमाध्यमिक शालांत शिक्षा पूर्ण केलेल्या व मा.शासन मान्य औदयोगीक प्रशिक्षण संस्थेचे नळ कारागीर / पाईप फिटरचे प्रमाणपत्र असलेल्या पात्र नळ कारागीराकडून रू. २०००/- इतके शुल्क आकारणीकरून एक वर्षाच्या मुदतीसाठी लायसन्स देता येईल तद्नंतर नुतनीकरणासाठी प्रति वर्ष रू.१५००/-अथवा मा. स्थायी समिती वेळोवेळी निश्चित करेल अशा दराने नुतनीकरण करता येईल.

त्यासाठी कलम ३७४- स्थायी समितीने लायसन्सदार, नळकारागीरांची फी आणि आकर विहीत करणे बाबत सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये खाजगी लायसन्सदार, नळकारागीर यांनी कोणत्या कामासाठी घ्यावयाच्या फी बाबतचा सविस्तर तपशिल जोडलेला आहे.

यास्तव कलम ३७४- स्थायी समितीने लायसन्सदार, नळकारागीरांची फी आणि आकार विहीत करणे बाबत सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये खाजगी लायसन्सदार, नळकारागीर यांनी कोणत्या कामासाठी घ्यावयाच्या फी बाबतचा सविस्तर तपशिल जोडलेला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत नागरिकांना सरकारी सेवा जलद आणि पारदर्शकपणे मिळणेच्या दृष्टीकोनातून खाजगी नळ कारागीरास अधिनियमातील वरील नमूद तरतूदीतील अटी व शर्तीच्या अधिन राहून उच्चमाध्यमिक शालांत शिक्षा पूर्ण केलेल्या व मा.शासन मान्य औदयोगीक प्रशिक्षण संस्थेचे नळ कारागीर / पाईप फिटरचे प्रमाणपत्र असलेल्या पात्र नळ कारागीराकडून रू. २०००/- इतके शुल्क आकारणी करून एक वर्षाच्या मुदतीसाठी लायसन्स देण्यास तद्नंतर नुतनीकरणासाठी प्रति वर्ष रू.१५००/-अथवा मा. स्थायी समिती वेळोवेळी निश्चित करेल अशा दराने नुतनीकरण करण्यास मा. प्रशासक याची मंजूरी देणेत येत आहे. सदरची बाब ही धोरणात्मक स्वरूपाची असल्याने अंतीम मंजूरीस्तव मा. महासभेकडे पाठविण्यात यावा.मा.स्थायी समिती च्या शिफारशीनुसार मा. प्रशासक सर्व साधारण सभा मजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका